http://lokadesh.in

मूल्य १ रु.

# लोकादेश

महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक

मुख्य संपादक : साजीद बडगुजर

किनवट, वर्षे १७ वे, अंक १५ वा, सोमवार, दि.०१ एप्रिल २०२४, पाने ०४

RNI No. MAHMAR/2007/20732 | Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025

# किनवट विधानसभा मतदारसंघातील १ हजार ७६५ केंद्राध्यक्ष व अधिका-यांना लोकसभा निवडणूकीचे दिले पहिले प्रशिक्षण



किनवट : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता १५- हिंगोली लोकसभा मतदार संघांतर्गत ८३- किनवट विधानसभा मतदार संघातील नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष / अधिकारी यांना पहिल्या प्रशिक्षणात मतदान यंत्र हाताळणी बाबत मार्गदर्शन करतांना सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली (भाप्रसे).

**लोकादेश न्यूज, किनवट : येथून जवळच असलेल्या कोठारी (चि) येथील मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता १५- हिगोली लोकसभा मतदार संघा अंतर्गत येणाा ८३- किनवट विधानसभा मतदार संघातील नियुक्त एक हजार सातशे पासष्ट मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी यांना पहिले प्रशिक्षण सुव्यवस्थित पार पडले.**

**सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना(भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या सत्रात मतदान केंद्राध्यक्ष व पहिले मतदान अधिकारी (९१५) व दुस-या सत्रात इतर मतदान अधिकारी (८५०) यांना सभागृहात पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन (पीपीटी ) द्वारे प्रशिक्षण व्यवस्थापन कक्ष प्रमुख मगाजी काकडे व सहायक मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे यांनी प्रशिक्षण दिले. सर्व क्षेत्रिय अधिकारी व सर्व मास्टर ट्रेनर यांनी १९ वर्ग खोल्यांमधून (इव्हीएम हँडसॉन ) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हाताळणी प्रशिक्षण दिले.**

कुणीही नेमणूक रद्द करण्यासाठी प्रयत्न करू नका. घरी असलेल्या लग्न कार्यासारखं देशाच्या सर्वात मोठ्या या उत्सवात स्वतःला झोकून देऊन मन लावून काम करा. आज प्रशिक्षणातून घरी जातांना सकारात्मक विचार घेऊन जा, त्यामुळे उत्साहाने अधिक जोमाने कार्य करण्यास उर्जा मिळेल, असे प्रेरणादायी विचार नांदेडचे निवासी उप जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी या प्रसंगी मांडले.

निवडणूक खर्च निरीक्षक कमलदीप सिंग यांनी प्रशिक्षण स्थळाला भेट देऊन पाहणी केली व समाधान व्यक्त केले. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कावली मेघना यांनी मतदान यंत्र हाताळणीच्या प्रत्येक कक्षात जाऊन प्रशिक्षणार्थीशी संवाद साधला. त्यांना प्रश्न विचारले व माहिती सांगितली. यावेळी तहसिलदार शारदा चौंडेकर (किनवट), किशोर यादव (माहूर) व क्षेत्रिय अधिकारी कक्ष प्रमुख वन विकास महामंडळाचे सहायक व्यवस्थापक जगदीश प-हाड उपस्थित होते.



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता १५- हिंगोली लोकसभा मतदार संघांतर्गत ८३- किनवट विधानसभा मतदार संघातील नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष / अधिकारी यांची पहिल्या प्रशिक्षणात PPT सादरणीकरण प्रसंगी उपस्थिती.

प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षण व्यवस्थापन कक्षाचे सहाय्यक रामेश्वर मुंडे, एम.डी. वांगीकर, एम.बी. स्वामी , सचिन भालेराव, एम.के. सांगवीकर, डी.जे. क्षीरसागर, मतदान कर्मचारी व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख नायब तहसीलदार व्ही.पी. राठोड, सहाय्यक डी.सी. भरे, नितीन शिंदे , प्रभू पानोडे , संदीप पाटील व कर्मचारी सोई सुविधा कक्षाचे सहायक गोविंद पांपटवार यांनी परिश्रम घेतले. प्रशिक्षण स्थळाच्या प्रवेशद्वारा समोर स्वीपकक्ष प्रमुख गट शिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांच्या मार्गदर्शनाखाली बालाजी इंदूरकर या कलावंतांनी काढलेली मतदार जनजागृती संदेश रांगोळी सर्वांचं लक्ष वेधून घेत होती. आजच्या प्रशिक्षणातील तो एक सेल्फी पॉईंट बनला होता.

# चुनाव का पर्व, देश का गर्व

## या भावनेने राष्ट्रीय कर्तव्य पार पाडा-जिल्हाधिकारी

## ८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदार प्रथम प्रशिक्षण



**नांदेड दि. ३० : जगातल्या सर्वात मोठया लोकशाही देशाच्या मताधिकार स्वातंत्र्याला अबाधित ठेवण्यासाठी आपण निवडणूक कार्यावर आहोत. लोकशाहीच्या या अभिव्यक्ती मध्ये निवडणुकांमधील मताधिकार, मतदान प्रक्रिया राबविताना राष्ट्रीय कर्तव्याचे भान प्रत्येक कर्मचा-यांने ठेवावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज येथे केले.**

८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदार प्रथम प्रशिक्षण कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. निवडणुकीच्या महत्त्वाच्या टप्प्यात आता आपण पोहोचलो असून या टप्प्यामध्ये बिनचूकपणे सामान्य माणसाला त्याचा मताधिकार पूर्ण करता येईल, यासाठी प्रयत्न करायचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी १६-नांदेड लोकसभा मतदार संघाच्या अंतर्गत, ८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावरील अधिकारी / कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण, EVM Handson Training सह दि.३०/०३/२०२४ रोजी सचखंड पब्लीक स्कुल, गुरु ग्रंथ साहिब भवन, नांदेड येथे आयोजीत करण्यात आले होते.

प्रशिक्षण दोन सत्रात घेण्यात आले. प्रशिक्षणाच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांचे ललितकुमार व-हाडे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) नांदेड यांनी स्वागत केले. त्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात झाली, प्रत्येक मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी चुनाव का पर्व, देश का गर्व या भावनेने राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जबाबदारीने प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष मतदान केंद्रावरील येणा-या संभाव्य समस्यांबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या. तसेच सदर समस्यांचे निराकरण प्रशिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण केल्यास निवडणूक पार पाडणे घेणे अधिक सुलभ होते, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी प्रशिक्षणात केले.

दोन्ही सत्रात श्री. ललितकुमार व-हाडे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (रोहयो) नांदेड यांनी विस्तृतपणे पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनच्या (सादरीकरणाच्या) माध्यमातून मतदान प्रक्रिया सरु झाल्यापासून ते समाप्त होईपर्यंतची कामे करण्याबाबत प्रशिक्षण दिले. यात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) व VVPAT (Voter Verifiable Paper Audit Trail) व्ही.व्ही.पॅट यंत्रासंबंधी महत्वपुर्ण माहिती देण्यात आली. निवडणूकीशी संबंधित विविध फॉर्मस् कसे भरतात, कोण-कोणत्या समस्या येवू शकतात व त्या समस्यांचे उपाय कोणते याबद्दल सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. सदरील प्रशिक्षण संवादात्मक व चर्चात्मक पध्दतीने घेण्यात आले. यावेळी प्रशिक्षण मंचावर श्री.रामदास कोलगणे, व तहसिलदार प्रगती चोंडेकर, श्री.बालाजी सोनटक्के, नायब तहसिलदार हे उपस्थित होते.

निवडणूक कार्यप्रणाली व मतदान केंद्रावरील कर्तव्ये, विविध फॉर्म, विविध प्रपत्रे, संवैधानिक व असंवैधानिक लिफाफ्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) वापराबाबतची सुलभ प्रक्रीया चर्चेव्दारे समजावून सांगण्यात आली व प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांचे / शंकांचे निरसन करण्यात आले. प्रत्येक सत्रातील पहिल्या टप्प्यात माहिती विषयक प्रशिक्षण दिले तर, दुस-या टप्प्यात प्रत्यक्ष ई.व्ही.एम. वापराचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणास सुमारे १८०० कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या प्रत्येक सत्राच्या दुस-या टप्प्यात सर्व क्षेत्रिय अधिकारी आणि कन्ग मास्टर ट्रेनर यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) व VVPAT (Voter Verifiable Paper Audit Trail) व्ही.व्ही.पॅट प्रत्यक्ष हाताळणीबाबतचे प्रशिक्षण उपस्थित कर्मचारी यांना देण्यांत आले. यामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) जोडणी कशी केली जाते याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणात टपाली मतपत्रिकेव्दारे मतदान करण्यासाठी निवडणूक कार्य प्रमाणपत्रासाठीचा अर्ज नमुना १२ अ व टपाली मतपत्रिकेची मागणी नोंदविण्यासाठीचा नमुना १२ भरून टपाली मतपत्रिका प्राप्त करणेबाबत देखील सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. निवडणूक कर्तव्यावर राहून सूध्दा मतदान करता येईल ही जाणीव करून देण्यात आली.

प्रशिक्षणाच्या ठिकाणी विविध कर्मचारी यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी एकूण १५ टेबलवर ३० कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच मतदार सहायता कक्ष, रूग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेचे अग्निशमन दल, शहर वाहतूक शाखेचे वाहतूक पोलीस, यांना पाचारण करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाच्या ठिकाणी आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या प्रशिक्षण सत्राचे सूत्रसंचालन श्री.रामदास कोलगणे, तहसिलदार व श्रीमती प्रगती चोंडेकर, तहसिलदार यांनी केले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी ८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघातील सर्व अधिकारी / कर्मचारी विशेष परिश्रम घेतले.

# खा.बापूराव सोयाम यांची नाराजी दूर करण्यात आ.भीमराव केराम यांना यश

## दिल्लीत यशस्वी शिष्टाई



**लोकादेश न्यूज, किनवट : सीमावर्ती तेलंगणा राज्याच्या आदिलाबाद लोकसभेचे खासदार सोयाम बापुराव यांना पक्षाने उमेदवारी नाकारल्याने ते नाराज होते. तेलंगणाच्या भाजप प्रदेशाध्यक्षांच्या सुचनेनुसार किनवटचे आमदार भीमराव केराम यांनी याप्रकरणात लक्ष घालून यशस्वी शिष्टाई केल्याने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्यासमक्ष खा. बापुराव यांनी आपली नाराजी दूर झाल्याचे सांगितले.**

तेलंगणा भाजपने आदिलाबादचे विद्यमान भाजप खासदार सोयाम बापुराव यांना उमेदवारी नाकारून 'बीआरएस'चे माजी खासदार नागेश गोडाम यांना महायुतीची उमेदवारी दिली. यामुळे खा.बापुराव यांनी उघड नाराजी व्यक्त केली. त्यांची नाराजी पक्षासाठी हानिकारक ठरणार असल्याने तेलंगणाचे भाजप प्रदेशाध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यांनी याप्रकरणात आदिलाबादच्या सीमावर्ती भागातील किनवटचे भाजप आ.भीमराव केराम यांना लक्ष घालण्याची सूचना केली. त्यानंतर आ.केराम यांनी सोयाम बापुराव यांची भेट घेऊन त्यांची समजूत काढली. त्यानंतर शुक्रवारी दि.२९ आ.भीमराव केराम, तेलंगणाचे भाजप प्रभारी अशोकराव मस्तापुरे यांनी नवी दिल्ली येथे खा.सोयाम बापुराव यांची भाजपाध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्याशी भेट घालून दिली. यावेळी नड्डा यांची खा.बापुराव यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली. या चर्चेनंतर आपली नाराजी दूर झाल्याचे सांगून भाजप महायुतीचे उमेदवार नागेश गोडाम यांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार असल्याची ग्वाही खा.सोयाम बापुराव यांनी दिल्याची माहिती आ.भीमराव केराम यांनी दिली.

# नांदेडमध्ये शनिवारी दोन अर्ज दाखल; आतापर्यंत एकुण ३ अर्ज दाखल

## शनिवारपर्यंत ८४ अर्जाची कक्षातून उचल

**नांदेड दि.३० : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत आज शनिवारी नांदेड लोकसभा मतदारसंघामध्ये दोन अर्ज दाखल करण्यात आले. गेल्या गुरुवारी एक व आज शानिवारी २ असे एकूण आतापर्यंत ३ अर्ज दाखल झाले आहेत.तर आतापर्यंत ८४ अर्जाची उचल झाली आहे.**

आज नामनिर्देशन पत्र दाखल करणा-या उमेदवारामध्ये वंचित बहुजन आघाडीतर्फे अकबर अख्तर खॉन यांनी अर्ज दाखल केला आहे. तर दुसरा अर्ज साहेबराव भिवा गजभारे या अपक्ष उमेदवाराचा आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी १६- नांदेड लोकसभा मतदारसंघ तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली आहे. यापूर्वी गुरुवारी अपक्ष उमेदवार जफर अली खाँ मेहमूद अली खाँ पठाण यांनी अर्ज दाखल केला आहे.

लोकसभेच्या दुस्या टप्प्यात नांदेड लोकसभा निवडणूक होत आहे.२८ मार्च ते ४ एप्रिलपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहे. उद्यापासून पुढील पाच दिवस अर्ज दाखल करता येणार आहे. अर्जाची छाननी ५ एप्रिलला होईल. अर्ज ८ एप्रिलपर्यंत मागे घेता येईल. तर नांदेड लोकसभा निवडणुकीत नेमके किती उमेदवार हे आठ तारखेला निश्चित होईल.

**८५ अर्जाची इच्छूकांकडून उचल**

नांदेड लोकसभा संघाची निवडणूक २६ एप्रिल रोजी घेण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराला किंवा त्यांच्या सूचकाला नामनिर्देशनपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयातील उमेदवार सहाय्य कक्षात मोफत उपलब्ध आहेत. काल गुड फ्रायडे असल्यामुळे अर्ज घेण्यासाठी सुटी होती.आज तिस-या दिवशी आणखी ३४ कोरे फॉर्म उमेदवार व प्रतिनिधी घेऊन गेले आहेत. पहिल्या दिवशी ५० कोरे फॉर्म उमेदवार सहाय्यता कक्षातून इच्छूकांनी घेतले होते. त्यामुळे आतापर्यंतच्या उचल झालेल्या अर्जाची संख्या ८४ झाली आहे.

**५ एप्रिलला छाननी**

नामनिर्देशनपत्राची छाननी शुक्रवार ५ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी परिसरातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृह येथे करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याबाबतची सूचना उमेदवारांना सोमवार ८ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यत देता येईल.

**प्रवेशासाठी प्रतिबंधित क्षेत्र**

उमेदवारी अर्ज परत घेण्याच्या दिनांक पर्यत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांपासून तर उमेदवारी अर्ज दाखल करणे व अर्ज प्राप्त करण्यासाठी येणाऱ्या सर्व नागरिकांना ओळख ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. अर्ज देण्याच्या प्रक्रिये काळात हे क्षेत्र अंशतः प्रतिबंधित करण्यात आले आहे.जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षापुढेच सहाय्यता कक्ष असल्यामुळे सकाळी ११ ते ३ या काळात अत्यावश्यक काम असल्याशिवाय या परिसरात परवानगी शिवाय प्रवेश बंदी आहे.




# किनवटमध्ये दर १० मिनिटाला वीज गूल; कृत्रिम पाणीटंचाईमुळे नागरिक त्रस्त

किनवट (आशिष देशपांडे) : महावितरणच्या गलथान कारभारामुळे शहराच्या विविध भागात दर १० मिनिटाला वीज गूल होत असल्याने रणरणत्या उन्हात नागरिक हैराण आहेत. अनियमित वीजपुरवठ्यामुळे तालुक्यात पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. किनवट शहरासह तालुक्यात महावितरणच्या गलथानपणामुळे गेल्या महिनाभरापासून अनियमित वीजपुरवठा होत आहे. झाडाचे पान जरी हलले की,वीज गूल होत असल्याने रणरणत्या उन्हात तसेच उष्णतेच्या काहिलीत लोक त्रस्त होत आहेत.येथील महावितरण कार्यालयात अधिकारी, कर्मचारी स्थानिकचे असल्याने ते मनमानी पद्धतीने वागतात. वीज उपकेंद्रात अधिका-यांचे लक्ष नसल्याने साधनसामुग्रीचा तुटवडा असल्याचे एका कर्मचा-याने सांगितले. महिन्याकाठी लाखोंची बिले वसूल होत असताना वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात महावितरण असमर्थ ठरत आहे. वाढते तापमान त्यातच रमजान महिना असल्याने वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, या मागणीचे निवेदन आठवडाभरापूर्वीच विविध भागातील युवकांनी महावितरणला दिले होते, परंतु याचा कोणताच परिणाम झाला नाही. सध्या विविध भागात दर १० मिनिटाला वीज खंडित होत आहे. कहर म्हणजे कमी - अधिक दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे पंखे, कूलर्स, फ्रीज, विद्युत मोटारी आदी विद्युत उपकरणांत बिघाड होत आहे. किनवट शहरात ही स्थिती, तर ग्रामीण भागात तर लोकांचे मोठे हाल होत आहेत. ऐन पाणीपुरवठ्याच्या वेळेत वीज गूल राहात असल्याने तालुक्यात पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण झाली आहे. वीज गूल होताच सर्व अधिकारी, कर्मचा-यांचे भ्रमणध्वनी 'व्यस्त' असतात. वीज समस्या निराकरणासाठी महावितरणने ८४८५८९९३९९ ही व्हॉट्सप सेवा सुरु केली आहे. परंतु, उपरोक्त क्रमांकही सातत्याने व्यस्तच असल्याने तक्रार कुठे करावी, असा प्रश्न त्रस्त नागरिकांना पडला आहे. जिल्ह्याच्या अखेरच्या टोकाला असलेल्या किनवट या आदिवासीबहुल भागात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे आदेश असतानाही सातत्याने होणा-या अखंडित वीज पुरवठ्यामुळे नागरिक वैतागले आहेत.

# हिंगोली लोकसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी दुस-या दिवशी एक अर्ज दाखल आज १४ उमेदवारांना ५६ अर्जांचे वितरण

**हिंगोली (जिमाका), दि. ३० : हिंगोली लोकसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी दुस्या दिवशी आज एक अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिली.**

हिंगोली लोकसभा निवडणुकीच्या नामनिर्देशन प्रक्रियेला गुरुवार, दि. २८ मार्चपासून सुरुवात झाली आहे. या मतदार संघासाठी २६ एप्रिल रोजी दुस-या टप्प्यात मतदान होणार आहे. आज नामनिर्देशनपत्र वितरण व स्विकृतीच्या दुस-या दिवशी १४ उमेदवारांना ५६ अर्जांचे वितरण करण्यात आले असून, आतापर्यंत एकूण ५४ इच्छुक उमेदवारांना १७५ नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. तर दुस-या दिवशी शिवसेना पक्षाचे उमेदवार हेमंत श्रीराम पाटील यांनी एक नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, अपर जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी तसेच अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार नवनाथ वगवाड यांच्यासह निवडणूक याकामी नियुक्त अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते.

एका उमेदवारास जास्तीत जास्त ४ अर्ज घेता येतात. नामनिर्देशनपत्रे ४ एप्रिलपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत सादर करता येतील. रविवार, दि. ३१ मार्च रोजी नामनिर्देशन पत्र वितरण व स्वीकृती बंद राहणार आहे. शुक्रवार, दि. ५ एप्रिल रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ८ एप्रिल २०२४ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे.

# व्हॉटसॲपवर कर्मचा-याकडून प्रचार, नांदेड जिल्ह्यातील कर्मचारी निलंबीत

**नांदेड, दि. २८ : निवडणूक काळात आपल्या 'व्हाट्सअप ', ग्रुप वरून प्रचार करणे एका कर्मचा-याला महागात पडले आहे. आचारसंहितेचा भंग करणा-या नांदेड जिल्हा परिषदेच्या एका कर्मचा-याला आज निलंबित करण्यात आले आहे.**

पंचायत समिती नायगाव येथील यु. एस. धोटे या वरिष्ठ सहाय्यकाला निलंबित करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी आज जारी केले आहे. 'व्हाट्सअप 'द्वारे निवडणुकीच्या प्रचाराबाबतचा संदेश देऊन या कर्मचा-याने आदर्श आचारसंहितेच्या नियमाचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील कलम व ४ कायद्यान्वये ही कारवाई करण्यात आली आहे. निवडणुकीच्या काळात निलंबनाची ही पहिली कारवाई ठरली असून आदर्श आचारसंहितेचा भंग कोणाकडूनही होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# जगावे की मरावे? मानवी अस्तित्वच पणाला

## देशाची अर्थव्यवस्था आजही कृषिआधारित आहे आणि देशातील शेतीवर, निसर्गावर अवलंबून आहे.

मानवी प्रगती आणि समृद्धी याला केवळ तंत्रज्ञानाचा विकास कारणीभूत नसतो. पर्यावरण आणि या पर्यावरणाला माणूस कशा पद्धतीने जपतो, पर्यावरणाची समृद्धी कशा पद्धतीने करतो, यावर खरा विकास अवलंबून असतो. मानवी समुदायाची गोष्ट पाहिली म्हणजे याची खात्रीच पटते! विकासाची व्याख्या बदलत असताना, आज मानवी हस्तक्षेपाने निसर्गाची जी वाताहत सुरू आहे, त्यावरून, येणारा काळ सर्वांसाठी संकटाचा असणार आहे! अवकाळी पाऊस, वाढणारे उष्ण दिवस, बदलते तापमान याचीच तर साक्ष देत आहेत. यंदाच्या उन्हाळ्यातही सरासरीपेक्षा जास्त तापमान असेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. देशाची अर्थव्यवस्था आजही कृषिआधारित आहे आणि देशातील शेतीवर, निसर्गावर अवलंबून आहे. बदलत्या हवामानाचा मोठा फटका शेतीला बसत आहे. कमी किंवा जास्त पाऊस, उष्णतेचे जास्त दिवस यासाठी जे घटक कारणीभूत ठरतात, त्यामध्ये एल-निनो आणि ला-निना हे आहेत. भारतातील सर्व शेतक्यांना खरे तर याची जाणीव असायला हवी. एल निनो म्हणजे स्पॅनिश भाषेत लहान मुलगा.

दक्षिण अमेरिकेतील एका मच्छीमाराने समुद्राच्या वरच्या थराचे तापमान कमी-जास्त होत असल्याचे प्रथम पाहिले. ही घटना सोळाव्या शतकामधील. डिसेंबरमध्ये एल-निनोचा प्रभाव सर्वाधिक असतो. ला निना म्हणजे स्पॅनिश भाषेत लहान मुलगी. एल-निनोच्या अगदी उलट परिणाम ला-निनामुळे होतो. पाऊस जास्त पडण्यास ला-निना कारण ठरतो. प्रशांत महासागरातील पाण्याचे तापमान कमी किंवा जास्त झाले, तर वा-याची दिशा बदलते. एरव्ही आशिया खंडाकडे वाहणारे वारे दक्षिण अमेरिकेकडे वाहतात आणि हवामानाचा पूर्ण पॅटर्नच बदलतो. याचा परिणाम आपल्याकडे भारतात पाऊस कमी होण्यावर होतो. याउलट ला-निनामध्ये अधिकाधिक वारे आशिया खंडाकडे वाहतात. एल-निनोच्या टप्प्यानंतर सर्वसाधारणपणे एनसोचा (एल-निनो सदर्न ऑसिलेशन) टप्पा येतो आणि बहुतांश वेळा एल-निनोनंतर ला-



निनाची स्थिती येते. या तांत्रिक बाबी सांगण्याचे कारण म्हणजे देशात सध्या एल-निनो उतरणीच्या मार्गावर आहे आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला याचा प्रभाव संपण्याची शक्यता आहे. अर्थात यामुळे दोन गोष्टी घडत आहेत. एक म्हणजे उन्हाळ्यात एल-निनोचा प्रभाव अद्याप असल्यामुळे उष्णतेच्या लाटांची संख्या वाढणार आहे आणि दुसरी म्हणजे जूनपर्यंत एल-निनोचा प्रभाव कमी होणार असल्याने येणारा पावसाळा सुखद असणार आहे. पावसाच्या दृष्टीने आणखी अचूक अंदाज एप्रिल महिन्याच्या मध्यातच समजेल. त्यामुळे तूर्तास उन्हाळा सर्वांसाठी कठीण राहणार आहे, हे अधिक महत्त्वाचे. उन्हाळ्यात सर्वसामान्यांनी काय काळजी घ्यावी याबाबतचे मार्गदर्शन तज्ज्ञ मंडळी करीत असतात. पण, हा उन्हाळा आणखी एका कारणासाठी वेगळा आहे. त्याचे कारण म्हणजे पुढील दोन महिने देशभरात होणार असलेल्या मध्यावधी निवडणुका आणि त्यासाठीचा जोरदार प्रचार. उमेदवारांसोबतच कार्यकर्तेही या काळात घरोघरी प्रचार करणार. हवामानाच्या अंदाजानुसार मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात सरासरीपेक्षा अधिक तापमान राहणार आहे. रात्रीचेही तापमान सरासरीपेक्षा जास्त राहणार आहे. प्रचाराच्या रणधुमाळीत हवामानाच्या या अंदाजाची दखल किती जणांनी घेतली असेल? एखाद्या सभेच्या ठिकाणी हवामानाचा हा अंदाज पाहून कुठला उमेदवार लोकांच्या बसण्याची आणि आवश्यक त्या इतर सुविधांची सोय करील? एखादा अपघात झाल्यानंतरच जाग येऊ नये, ही अपेक्षा.

प्रचाराबरोबरच मतदानही ऐन उन्हाळ्यात होत आहे. त्यामुळे मतदान केंद्रांसह सर्व ठिकाणी उन्हाळ्याची दखल घेऊन आवश्यक त्या सुविधा जागोजागी उभारण्याची गरज आहे. आपल्या दैनंदिन आयुष्याशी निगडित इतक्या मोठ्या घटकाबद्दल अनेकांना फारशी माहिती नसते, त्याबद्दल ते जागरूकही नसतात... पर्यावरण, ई-कच-याचे संकलन, तापमानबदल, बेकायदा वृक्षतोड, टेकड्यांची होणारी कत्तल, पर्यावरणाचा विनाश करून होणा-या विकासाच्या व्याख्या यांसारखे मुद्देही निवडणुकीत दिसत नाहीत. लोकशाहीत लोक जेवढे जागरूक, तेवढी तिथली प्रशासन व्यवस्था सुनियोजित आणि कार्यक्षम. एल-निनो आणि ला-निनाबाबत जागरूक राहून त्यानुसार शेतकरी पीक घेत असतील, अशी स्थिती नाही. हवामानाबरोबरच पर्यावरणाच्या बाबतीत अधिक साक्षर होणे अपरिहार्य आहे. मानवी अस्तित्वच पणाला लागले आहे. जगावे की मरावे, असा हा सवाल आहे. पण, निवडणुकीच्या रणधुमाळीत रमलेल्यांना त्याचे भान तरी आहे का?

# किनवट तालुक्यातील २१ जलप्रकल्पांत ४७.९३ टक्के जलसाठा

## गतवर्षी वार्षिक सरासरीच्या ११५.४९ टक्के पडला पाऊस



**लोकादेश न्यूज, किनवट, ता.२९ : सतत तीन वर्षापासून तालुक्यात पाऊस वार्षिक सरासरी ओलांडत असल्यामुळे, पावसाळाभर सर्वच प्रकल्प तुडुंब भरून वहात होते. या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामास पाणी पुरवठा करूनही सध्या किनवट तालुक्यातील एकूण २१ जलप्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठा ४७.९३ टक्के असा समाधानकारक आहे. त्यामुळे यंदाही पाणी टंचाईच्या समस्या भेडसावण्याची शक्यता कमी आहे.**

किनवट तालुक्यात नागझरी,लोणी व डोंगरगाव येथील तीन मध्यम प्रकल्प, सिरपूर व मांडवी येथील दोन बृहत लघु तलावाशिवाय इतर १३ लघु तलाव व ३ साठवण तलाव आहेत. तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान पूर्वी १ हजार २४० मी.मी. होते. हवामान विभागाने तालुक्यातील ब्याच वर्षांच्या वार्षिक पर्जन्यमानाचा अभ्यास करून, सन २०२० पासून किनवट तालुक्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान १ हजार ६३.०९ मी.मी. एवढे निश्चित केलेले आहे. राज्य शासनाच्या पर्जन्यमानाच्या पोर्टलवरील नोंदीनुसार गेल्या पावसाळ्यातील ०१ जून ते ३१ ऑक्टोबर दरम्यान किनवट तालुक्यात पडणारा सरासरी पाऊस १,०२६.५८ मि.मी. असून, याच कालावधीत किनवट तालुक्यात प्रत्यक्षात पडलेला सरासरी पाऊस १,१८५.६० मि.मी.आहे. जो की उपरोल्लेखित पर्जन्यमानाच्या ११५.४९ टक्के पाऊस झालेला आहे. एवढा मुबलक पाऊस झाल्यामुळेच, आजपावेतो एकही प्रकल्पातील पाणी ज्योत्याखाली गेलेले नसून, यंदा रब्बी हंगामातील पिकांना या प्रकल्पांतील पाण्यामुळे बराच दिलासा मिळालेला आहे.

आजमितीस ज्या मध्यम, बृहत व लघू प्रकल्पासह साठवण तलावात प्रत्यक्ष उपयुक्त जलसाठा आहे, त्याची आकडेवारी दशलक्ष घनमिटर मध्ये पुढील प्रमाणे असून, कंसातील आकडे त्याची टक्केवारी दर्शवितात. नागझरी मध्यम प्रकल्प - ३.१२२ (४७.५६), लोणी मध्यम प्रकल्प - ४.७२६ (५६.३८), डोंगरगाव मध्यम प्रकल्प-४.९० (५५.७५), सिरपूर बृहत- ०.७५३ (१८.०२), मांडवी बृहत- १.३६६ (२६.५७), लघू प्रकल्प : कुपटी - ०.२७० (२०.८२), मूळझरा-०.७१३ (३९.३१), थारा-०.५५१ (६३.८१), निचपूर-१.३१० (५९.२४), जलधारा-१.०६८ (५७.२०), सिंदगी-०.७२० (४५.१९), हुडी-०.७८५ (५०.१६), पिंपळगाव (कि.)-१.२२५ (५६.५३), नंदगाव-०.४५९ (३१.४०), अंबाडी-०.२६६ (३२.७१), दरसांगवी-१.४३६ (५३.४४), पिंपळगाव (भि.)-.२२१ (५३.५४), सारगाव-०.५६४ (४३.०४), निराळा सा.त.-१.५३३ (६७.७७), सिंदगी सा.त. -१.१३६ (४९.०९), लक्कडकोट सा.त.-१.३०७ (७२.०५).

उपरोक्त प्रकल्पातील मांडवी प्रकल्पातील सदोष वितरण व्यवस्थेमुळे प्रकल्पाचे पाणी कॅनालद्वारे शेवटच्या शेतापर्यंत पोहचत नसल्यामुळे, अनेक शेतक-यांनी त्याबाबत मंत्रालयापर्यंत तक्रारी केल्या आहेत. तेथून समस्येच्या निराकरणाबाबत पत्र येऊनही, तो प्रश्न अजूनही मार्गी लागलेला नसल्याचे एका शेतक्याने सांगितले. तसेच सिरपूर व कुपटी लघु प्रकल्पांमध्ये तांत्रिक दोष असल्यामुळे तेथील साठा २० टक्क्यांपर्यंत आलेला आहे. परिणामी उन्हाळी हंगामात तेथे पाणी टंचाई जाणवू शकते. खरीप व रब्बी हंगामातील सिंचनासाठी लघुप्रकल्पातील पाणी वापरल्या जाते तर मध्यम प्रकल्पातील पाणी खरीप, रब्बी व उन्हाळी अशा तिन्ही हंगामातील पिकांसाठी पुरविल्या जाते. निराळा, लक्कडकोट व सिंदगी येथील साठवण तलावामुळे भूगर्भातील पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होते व त्यातील पाणी जनावरांना पिण्यासाठी व नागरिकांना वापरण्यासाठी राखून ठेवल्या जाते. या सोबतच किनवट शहराला नळयोजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी नागझारी तलावातील १.५ द.ल.घ.मी. उन्हाळ्यात राखून ठेवले जाते.

# आदिवासी भागात आरोग्य सेवा सांभाळणारा देवमाणूस : डॉ.अशोक बेलखोडे



लोकादेश न्यूज, किनवट : किनवट येथील समाजसेवी तथा वैद्यकीय क्षेत्रातील एम एस पर्यंत उच्च शिक्षण घेऊन तज्ञ डॉक्टर म्हणुन किनवट सारख्या आदिवासी दुर्गम भागात आपली आरोग्यसेवा व कौशल्याचा लाभ वंचितांसाठी उपयोगी ठरावा या उदात्त हेतूने वैद्यकीय क्षेत्रातील शासकीय नोकरी सोडून समाजसेवक बाबा आमटे सहवासात राहुन त्यांचा आदर्श समोर ठेवणारे डॉक्टर अशोक बेलखोडे यांनी आज पर्यंत राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमात लोकसंख्या नियंत्रणाला हातभार लावला असून आज पर्यंत त्यांनी एक लाख १२४ महिलांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याचा उच्चांक गाठल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. समाजसेवी डॉक्टर अशोक बेलखोडे यांनी २३ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गोलवट प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरात एक लाखाचा टप्पा ओलांडला आहे कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्याचा मोठे रेकॉर्ड डॉक्टर अशोक बेलखोडे यांनी केला आहे. नांदेड जिल्ह्यात आजपर्यंत २८ हजार शस्त्रक्रिया सोबत हिंगोली जालना छत्रपती संभाजी नगर लातूर परभणी वाशिम चंद्रपूर बुलढाणा यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील चिखलदरा व धारणी येथे जाऊन कुटूंब कल्याण शास्त्रक्रिया केल्या आहेत सोबतच शेजारील तेलंगणा राज्यातील आदिलाबाद उटनुर येथे जाऊन ही त्यांनी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या आहे यावेळी बोलताना डॉक्टर अशोक बेलखोडे म्हणाले या शस्त्रक्रिया करणे आपल्या आनंदाचा भाग असून आपण खूप मन लावून हे काम करतो त्या राष्ट्रीय कामात माझा सहभाग हाच माझ्या जीवनातील सर्वात आनंद असून माझ्या स्व. आईची प्रेरणा यामागे महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले २४ तासांमध्ये ४०० कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्याचा विक्रम ही डॉक्टर यांनी केला आहे आपण कधीही आकड्यांचा व संखेचा आपण विचार केला नाही उलट आपल्या हातून एक चांगले राष्ट्रीय काम घडत आहे स्त्रियांचे गरोदरपण बांळातपणाचा त्रास यातून त्यांची मुक्तता करणे ही भावना त्यामागे आहे असे मत डॉ.अशोक बेलखोडे यांनी व्यक्त केले आहे शासकीय मानधनासाठी आपण कधीही या शस्त्रक्रियेचा विचार केला नाही उलट एका शस्त्रक्रियेला वैद्यकीय अधिकारी यांना ७५ रुपये मिळतात तर कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त करणा-या ना दीडशे रुपये मानधन दिले जातो हा विरोधाभास असला तरीही जे मला मानधन मिळाले त्यातच मी समाधान मानले आहे थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या भारत जोडो पद यात्रेत डॉक्टर अशोक बेलखोडे यांनी मोठा सहभाग नोंदविला आणि डॉक्टर बाबा आमटे यांची प्रेरणा घेऊनच आपण १९९३ पासुन किनवट आदिवासी दुर्गम भागातील रुग्णांची सेवा करण्यासाठी आलो आहे किनवट हे आपला आयुष्यभराचे कार्यक्षेत्र म्हणून आपण निवडले आहे माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी किनवटलाचा राहणार असून १९९३ सालापासून मी ही अविरत सेवा करीत असतो आज तागायात अनेक विविध आरोग्य सेवां महायज्ञ सुरू आहे त्यांच्या कार्याचा विस्तार 'साने गुरुजी इमर्जन्सी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल' या विस्तारित प्रकल्प किनवट येथे साकारत आहे आदिवासी दुर्गम भागातील जनतेचा काळाच्या तिमिरात दडलेला चांगल्या आरोग्याचा उषःकाल त्यांना लाभावा हेच माझे आयुष्याचे अंतिम ध्येय असून माझ्या हातून आजपर्यंत घडलेल्या एक लक्ष १२४ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झाल्याचा मला आनंद असून ही माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत सेवा म्हणून अविरत कार्यरत राहणार असल्याचेही शेवटी डॉ.अशोक बेलखोडे यांनी बोलताना सांगितले.

# किनवटच्या जंगलात मोहफूल गळतीचा हंगाम सुरु

किनवट,दि.२७(प्रतिनिधी) : आदिवासींचा कल्पवृक्ष म्हणून सुपरिचित असलेल्या मनमोहक मोहाच्या फुलांचा हंगाम सुरु झाला असून, यामुळे भर उन्हाळ्यात आदिवासींना रोजगार उपलब्ध झाला आहे. सध्या भल्या पहाटे आदिवासी कुटुंब मोहफुलांची वेचणी करून घरी आणून त्यांना सावलीत वाळू घालताना दिसत आहेत. साधारणतः एका झाडापासून दररोज दहा ते वीस किलोपर्यंत कच्ची मोहफुले मिळतात.

किनवट च्या जंगलात अनेक औषधी वनस्पती दिसून येतात, यामध्ये मोहाच्या फुलांचा देखील आयुर्वेदिक औषधी म्हणून वापर होतो. तालुक्यातील वनात मोहाचे वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळून येतात. साधारणतः चैत्र पौर्णिमेपासून मोहाची झाडे फुलं, फळांनी बहरतात. मोह हा पानगळती प्रकारातला मोठा वृक्ष आहे. रात्री उमलणाऱ्या मोहाच्या फुलांनी बहरलेल्या झाडावरून पहाटे पासून फुले झडण्यास सुरुवात होते. या काळात मनाला तरारी देणारा, उत्साह वाढवणारा मनमोहक मोहाच्या फुलांचा सुगंध संपूर्ण रानावनात दरवळतो. साधारणता एक झाड हजाराहून अधिक फुले देतो. जमिनीवर सडयासारखी पडलेली फुले वेचण्यासाठी आदिवासी कुटुंब आबालवृद्धांसह झुंजुमुंजु झाल्या झाल्या रानात दाखल होतात. मोहाची फुले वेचण्यासाठी कुटुंबातील सर्वच सदस्य उन्हातान्हाचीच काय हिंस्त्र श्वापदांचीही पर्वा न करता गर्क असल्याचे चित्र आहे. आदिवासी बांधव आपल्या उपजीविकेचे साधन म्हणून वर्षभर मोहाच्या वृक्षांची देखभाल करत हक्काने फुले गोळा करून, त्यातून आपला चरितार्थ चालवतात. साधारणतः महिनाभर आदिवासी बांधवांना उदरनिर्वाहाचे साधन म्हणून मोहाची वृक्षे महत्वाची भूमिका बजावतात.

मोहाच्या वृक्षाचे अनेक फायदे असून, आदिवासी बांधव या मोह वृक्षास आयुर्वेदिक वनस्पती म्हणूनही वापरतात. अनेक औषधी गुणधर्म असलेल्या मोहाच्या फुलांचा वापर खाण्याच्या पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात येतो.यापासून भाजी व भाकरीतही त्याचा वापर होतो. मोहाच्या फुलांमध्ये साखर आणि अल्कोहोलचे प्रमाण चांगल्याप्रकारे असते. शुद्ध अर्काचो




खोकल्यासाठी औषध म्हणून उपयोग होतो. मोहाच्या बियांना टोरी म्हणतात. या बीयांपासून तेलही काढले जाते. या तेलाचा वापर स्वयंपाकासाठी केला जातो. . मोहाच्या बियांची जी पेंड उरते तिला जाळल्याने डांस पळून जातात. फुलांमध्ये केल्शियम, जीवनसत्वे व पोषक द्रव्ये भरपूर प्रमाणात असतात. तसेच फुलांचा वापर शुद्ध अल्कोहोल मिळविण्यासाठीही केला जातो. कच्ची फुले वेचून ती दोन ते तीन दिवस वाळवून स्थानिक बाजार पेठेत ३५ ते ४० रुपये प्रती किलो दराने घावूक व्यापाऱ्यांना विकली जातात. दिवस भरात साधारणतः एका वृक्षापासून १० ते २० किलो मोहाची फुले मिळतात. गर्भवती आणि स्तनदा मातांना मोह हे उत्कृष्ट पोषण स्त्रोत आहे. यातून त्यांना चांगले पोषण आहार मिळते. मोहापासून अनेक घरगुती वापरासाठीची उत्पादने तयार करता येतात. कोरडवाहू शेतीची कामे आटोपल्यानंतर ग्रामीण आदिवासींसाठी मोहफूल हे उत्पनाचे साधन आहे.

मोहफुलाचे आदिवासी बांधवांच्या जीवनातील महत्व ओळखून राज्य शासनाने २०२१ मध्ये मोहफुलांवरील निर्बंध हटविले असून, तसा शासननिर्णयही झालेला आहे. आदिवासी कुटुंबाचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यासाठी मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत मोहफूल-आदिवासी उपजीविकेचे एक साधन हा प्रकल्प राबविण्यास राज्य शासनाने दीड-दोन वर्षापूर्वीच मंजुरी दिली आहे.

# साने गुरूजी रुग्णालयातर्फे एकल पालकांच्या मुलींना शिक्षण सहाय्य निधीचे वाटप



लोकादेश न्यूज, किनवट : भारत जोडो युवा अकादमी, साने गुरुजी रूग्णालय किनवट येथे शनिवारी दि.३० ज्या मुलीच्या आई-वडिलापैकी एकच पालक हयात आहे,अशा २१ मुलींना प्रत्येकी ५ हजार रूपये याप्रमाणे एकूण १ लाख ५ हजार रूपयांची शैक्षणिक मदत करण्यात आली आहे. या अभिनव उपक्रमाचे हे दुसरे वर्ष होय.

किनवटची भूमीकन्या, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातून उपशिक्षणाधिकारी वर्ग-१ पदी निवड झालेल्या कु. प्रिया सटलावार यांच्या हस्ते मुलींना धनादेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना प्रिया सटलावार म्हणाल्या की, मनापासून शिकू इच्छिणाऱ्या परंतु, आर्थिक परिस्थितीची अडचण असणाऱ्या मुलींना हे अर्थसहाय्य त्यांच्या शिक्षणाच्या अडचणी दूर होण्यास मदतगार ठरेल. हा नवीन उपक्रम व संकल्पना सुरू केल्याबद्दल त्यांनी डॉ. अशोक बेलखोडे यांचे कौतुक केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोक बेलखोडे यांनी ग्रामीण, दुर्गम भागातील मुलींच्या शिक्षणासाठी मी सदैव प्रयत्नशील असल्याचे सांगितले. कार्यक्रमास भैय्याजी बेलखोडे, सौ. सुलोचना कोंडे, संजय बोलेनवार यांच्यासह विद्यार्थिनी व त्यांचे पालक तसेच साने गुरूजी रूग्णालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक ज्ञानेश्वर उईके यांनी केले. सूसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. अजय नरड यांनी आभार मानले.

# पवित्र रमजान संयम, आत्मपरिक्षणाचा महिना

लोकादेश न्यूज, किनवट : पवित्र रमजान महिन्यातील रोजे म्हणजे उपवास असून हा आत्मपरीक्षणाचा महिना आहे रोजांमध्ये भुकेची जाणीव होते आत्मपरीक्षणातून अनावश्यक आकांक्षावर व नियंत्रण करण्याची शिकवण मिळते संयम व आत्मपरीक्षणाचा हा महिना आहे प्रेषित महंमद पेगंबर म्हणाले रोजा करणाऱ्यांनी वाईट गोष्ट उच्चारू नये कुणाशी भांडू नये शिवीगाळ करणायास सांगावे की हे बंधू माझा रोजा उपवास आहे रमजानच्या या महिन्यात रोजा धारकास प्रत्येक क्षणी आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळते आपल्या जीवनात कळत नकळत घडलेल्या चुका चुकांची क्षमायाचना करण्याचा हा महिना आहे.

कुराणात गिबत म्हणजे दुसऱ्याच्या अनुपस्थितीत बोलणे होय मोहम्मद पैगंबर यांच्याकडे येऊन एका महिलेने गीबत केल्याची कबुली दिली यावर मोहम्मद दिगंबर म्हणाले असे आचरण करण्यास मनाई आहे आपण पुन्हा रोज धरा पवित्र परमेश्वराकडे माफी मागा रोजा करत असताना दुसऱ्याला दुःख होइल शब्द उचारु नये वाईट सवयी पासून आलीत राहणे हाच एकमेव उपाय आहे त्यासाठी खालील गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे पुत्र या नात्याने आपण आई-वडिलांबाबतचे कर्तव्य पूर्ण केले की नाही शेजार धर्म पाळला की नाही समाजाच्या अपेक्षेची पूर्तता करतो की नाही ज्या लोकांशी आपले विविध व्यवहार होतात किंवा तिथे नोकरी करतो तिथे संबंधित कामाशी प्रामाणिक राहतो की नाही या या सर्व गोष्टीचे शुद्ध मनाने आत्मपरीक्षण करणे हाच रोजाचा मुख्य उद्देश आहे

रमजान महिन्यात दिवसातील पाच नमाजा शिवाय. रात्री विशेष नमाज अदा केली जाते त्याच तरावीह असे म्हणतात रमजान महिन्यातील नमाज पठण आणि दान केल्यामुळे मानवाचे मन संतुष्ट होते रमजानच्या पवित्र महिन्यात येते ईद म्हणजे आनंदाचा दिवस होय नमाज पडल्यानंतर विश्वशांतीसाठी प्रार्थना केली जाते एकूणच मुस्लिम बांधवांसाठी पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे एक महिन्याच्या उपवासाची सांगता ईदच्या दिवशी केली जाते.

# किनवटच्या अतिदुर्गम पोतरेड्डी गावात स्वीपचा मतदार जागृती जागर




लोकादेश न्यूज, किनवट : तालुक्यातील डोंगरी ,अतिदुर्गम पोतरेड्डी गावात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी स्वीप कक्षाच्यावतीने मतदार जनजागृतीचा जागर कार्यक्रम घेण्यात आला.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनात स्वीपकक्ष प्रमुख गटशिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांच्या नेतृत्वात पोतरेड्डी येथे रविवारी दि.३१ मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी लोकसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

१५ - हिंगोली लोकसभा मतदारसंघ अंतर्गत ८३ - किनवट विधानसभा मतदारसंघातील ज्या गावांमध्ये मतदानाची टक्केवारी कमी आहे, त्या ठिकाणी स्वीप कक्षाच्यावतीने भेटी देऊन मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदार जनजागृती करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मौजे पोतरेड्डी येथे रविवारी भेट देऊन कॉर्नर बैठका आणि प्रबोधनात्मक गीत गाऊन आणि मतदारांशी संवाद साधण्यात आला. यावेळी बळीराम पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. पंजाब शेरे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून उपस्थित मतदाराशी संवाद साधून मतदान करणे का आवश्यक आहे, याविषयी माहिती दिली. गटशिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांनी उपस्थितांना निवडणुकीच्या दिवशी कुठेही न जाता मतदान करण्याचे आवाहन केले,त्यास ग्रामस्थांनी प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वीप कक्षातील प्रा.डॉ. मार्तंड कुलकर्णी, ग.नु. जाधव, रमेश मुनेश्वर, भुमय्या इंदूरवार, रुपेश मुनेश्वर, आदींनी प्रयत्न केले. साहेबराव वाढवे यांच्या ढोलकीच्या साथीने शाहीर नरेंद्र दोराटे यांनी मतदार जागृती गीतांतून मनोरंजनात्मक प्रबोधन केले. यावेळी गावातील पोलीस पाटील , शिक्षक , बीएलओ अंगणवाडी वर्कर , आशा वर्कर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमता विकसित करण्यासाठी कायम प्रयत्नरत रहा-ज्ञानोबा बने



लोकादेश न्यूज, किनवट, ता.२६ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा मुख्य उद्देश भारताला जागतिक स्तरावर ज्ञानाच्या बाबतीत सुपर पॉवर बनवणे, असा आहे. शिक्षकांनी या धोरणांचा चांगल्या प्रकारे अभ्यास करून, विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने अध्यापन पद्धतीमध्ये याचा वापर करावा. तसेच लोकशाहीतील सगळयात मोठ्या उत्सवात आपण सक्रिय सहभाग घेऊन, किमान पाच उदासीन नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रेरित करावे, असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांनी केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमतावृद्धी विषयक दि.२१ ते २३ मार्च या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर येथील रतनीबाई राठोड शाळेत संपन्न झाले. समारोपाच्या दिवशी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करतांना गटशिक्षणाधिकारी बने बोलत होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख ग. नू.जाधव, शाळेचे मुख्याध्यापक व्ही.एन. जाधव उपस्थित होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, एकविसाव्या शतकातील 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' अन्वये शैक्षणिक ढाच्यामध्ये, नियमांमध्ये, प्रशासकीय व्यवस्थांमध्ये अनेक सुधारणा व आमूलाग्र बदल नमूद करण्यात आले आहेत. या शतकातील शाश्वत विकास ध्येये प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उदिष्ट आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, संभाषण कला, सहकार्य, सहवेदना आणि आत्मविश्वास या कौशल्यांवर विशेषत्वाने लक्ष दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात शिक्षकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची वैशिष्ट्ये, अभ्यासक्रमाचा आराखडा, किशोरवयीन विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे हाताळणे, त्यांची क्षमता आधारित मुल्यांकन करणे, माहिती तंत्रज्ञानाचा शिक्षणामध्ये वापर करणे, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे अशा एकूण १२ घटकांविषयी प्रशिक्षण देण्यात आले. समारोपाचे दिवशी शिक्षक प्रतिनिधी म्हणून कॉस्मापॉलिटन विद्यालयातील बाळकृष्ण कदम यांनी हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण गेल्या अनेक दशकातील सर्वात मोठा बदल असून, विद्यार्थ्यांसाठीच नाही तर शिक्षकांसाठी सुद्धा अतिशय उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासह त्यांच्या विकासासाठी आपल्या देशात ही शिक्षण पद्धती अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.

या प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रशिक्षण व्यवस्थापक दयाळ मोगरकर, राजेंद्र कंतुलवार, सुलभक कें. प्र.अशोक हमदे, भूमय्या इंदरवार, के.एस. नकुले, आय.डी. वाघमारे, एम.आर.काढले, एस.एच.काळे, आर.जी.राठोड, एस.डी. राठोड, डी.के.राठोड, एस.सी. कांबळे, एस.एन. ब्रह्मण, के.टी.ननावरे, एस.एच. बोलेनवार, ए. येडे आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# नवमतदार, युवक युवतींनी मतदानाचा हक्क बजावावा-सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली



लोकादेश न्यूज, किनवट : अठरा वर्ष पूर्ण झालेल्या नवमतदार झालेल्या युवक युवतीनी मोठ्या प्रमाणात आपला मतदानाचा हक्क येणा-या लोकसभा निवडणुकीमध्ये बजवावा व आपल्या परिसरातील मतदारांना मतदान करण्यासाठी परावृत्त करावे' असे आवाहन किनवट माहूर विधानसभा मतदार संघ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी.मेघना.कावली यांनी किनवट येथे मतदान जनजागृती अभियानांतर्गत भव्य रॅलीला संबोधित करताना केले.

यावेळी त्यांच्या हास्ते हिरवा झेंडा दाखवून भव्य रॅलीला आरंभ झाला. प्रा.डॉ,मार्तंड कुलकर्णी यांनी प्रास्तावक केले. याप्रसंगीस्वीप पक्षाचे प्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी ज्ञानोबाजी बने, प्राचार्य एस.के. बेंबरेकर स्वीप कक्षाचे सर्व सदस्य व पत्रकार उपस्थित होते.

मतदार जागृती अभियाना निमित्त दि.२७ मार्च रोजी रॅलीचे आयोजन करण्यात आले. यात शहरातील सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालय, बळीराम पाटील महाविद्यालय, पाटील अकॅडमी, यशवंत अकॅडमी, जाधव अकॅडमी, व्हीजन अकॅडमी आदि विभागातील विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. यावेळी सहभागी मुला-मुलींनी मतदार जागृती अभियाना संदर्भात, 'मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो... अशा घोषणा देत शहर दुमदुमून गेले. या रॅलीचा आरंभ आय.टी.आय. गोकुंदा येथुन झाला. तर समारोप किनवट येथील क्रीडा संकुलाच्या झाला. समारोपीय कार्यक्रमात सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीते साठी स्वीट कक्षाचे डॉ.पंजाब शेरे, उत्तम कानिंदे, रमेश मुनेश्वर, ग. नू.जाधव, रुपेश मुनेश्वर, स्वामी सर, इंदूरवार सर यांच्यासह शहरातील दोन्हीही महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका शिक्षक तहसील विभागातील शिंदे, गोवींद पांपटवार, कांबळे आदी कर्मचा-यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

# किनवटमध्ये नायक, कारभारी परिषदेस प्रतिसाद




**लोकादेश न्यूज, किनवट : संत गजानन महाराज मंदिर सभागृहात ता.३० रोजी नायक, कारभारी, पुजारी यांची परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेस चांगला प्रतिसाद मिळाला.**

परिषदेच्या निमित्ताने श्री. जगदंबा देवी व संत सेवालाल मंदिर गोकुंदा येथे भोग विधी पार पडला. गोर बंजारा समाजातील महिलांनी आपली पारंपरिक वेशभूषा परिधान करून कलश पूजन व पारंपरिक नृत्य सादर केले. मांडवी येथील महिलांचा संच तसेच सुरेश धर्मा राठोड व त्यांच्या पत्नी उपस्थित होत्या. या परीषदेसाठी किनवट, माहूर, वाढोणा, हदगाव, भोकर या तालुक्यातून सुमारे सातशे ते आठशे नायक -कारभारी, पुजारी व तांड्यातील प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती. या परिषदेसाठी कर्नाटक राज्यातील गोर बंजारा समाजाचे संत सोमलिंगम महाराज,विश्व हिंदु परिषदेचे आंतरराष्ट्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे, संत सुरेश महाराज, संत श्याम चैतन्य महाराज, संत गंगेश्वर महाराज, अजित साबळे चंद्रपूर, केंद्रीय धर्मप्रसार सहप्रमुख, आनंद गोयल, देवगिरी प्रांतमंत्री योगेश्वर गर्गे, दादाजी सिंगर देवगिरी प्रांत धर्मप्रसारक ललित चौधरी यांच्यासह किनवटचे आमदार भीमराव केराम, महाराष्ट्र राज्याचे आरोग्य दूत रामेश्वर नायक, संतोष तिरमनवार, डॉ.अशोक पाटील सूर्यवंशी, सौ.संध्या राठोड, डॉ.मोहन चव्हाण, धरमसिंग राठोड, सचिन नाईक आदींची उपस्थिती होती. या परिषदेत समाजासाठी समर्पित भावनेने सेवा करणारे भावसिंग राठोड यांचा मिलिंद परांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शंकर राठोड यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा.घनश्याम राठोड यांनी केले. उल्हास राठोड यांनी आभार मानले.परिषदेच्या यशस्वीतेसाठी सागर राठोड, उल्हास जाधव, कैलास महाराज, सुनील महाराज, संतोष आडे, विजय पवार, वाय. एम. राठोड,दिगंबर पवार, श्याम रायेवार, अनिरुद्ध केंद्रे, संतोष रायेवार आदींनी प्रयत्न केले.

# जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण, पेड न्यूजवर लक्ष ठेवणे 'एमसीएमसी 'चे प्रमुख कार्य : अभिजीत राऊत

## नियोजन भवनातील माध्यम कक्षाचा जिल्हाधिका-यांकडून आढावा



नांदेड दि. २९ : राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण, प्रिंट माध्यमात येणाया जाहिराती व मजकूर या माध्यमातून पेड न्यूज तर जात नाही याची देखरेख, पॉम्प्लेट, हॅन्डबिल यावर प्रकाशक व मुद्रकाचे नाव तपासणे, जाहिराती व पेड न्यूजचा खर्चाचा अहवाल एक्सपेंडिचर (खर्च) विभागाला देणे ही प्रमुख कामे माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे (एमसीएमसी) असून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनमध्ये कॅबीनेट हॉलपढे सर्व सुविधांनी युक्त अशा एमसीएमसी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी एमसीएमसी समितीचे अध्यक्ष असतात त्यांनी या कक्षाला भेट देऊन आतापर्यंत झालेल्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांचे स्वागत माध्यम केंद्राचे प्रमख जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण कक्षाचे सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी केले. यावेळी एमसीएमसी समिती सदस्य व माध्यम कक्षातील कर्मचारी उपस्थित होते.

राजकीय प्रचाराच्या जाहिरातींबाबत भारत निवडणूक आयोगाने नियमावली निश्चित केली आहे. या नियमावलीनुसार राजकीय पक्ष व उमेदवारांना दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हॉईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या दिवशी आणि त्याच्या एक दिवस अगोदर वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती या माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एम.सी.एम.सी.) पूर्व प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करणे सुरू झाले असून हे काम गांभीर्याने करण्याचे त्यांनी सांगितले.

जाहिरात प्रसारित होण्याच्या ४८ तास अगोदर राजकीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरात प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करावा.अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवसापूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती अर्थात एम.सी.एम.सी समिती ही अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो अर्ज ४८ तासात निकाली काढेल. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानसार दुरूस्त्या करून नवीन निर्मित केलेली जाहिरात प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. टिव्ही चॅनलद्वारे जाहिराती जर प्रसारीत करावयाच्या असतील तर अशा जाहिराती समितीकडे प्रसारणाच्या तीन दिवस अगोदर प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. समिती याबाबत दोन दिवसात निर्णय देईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

जाहिरात प्रमाणीकरणासाठीचा अर्ज हा विहित नमुन्यात सादर करावा. अर्जामध्ये अर्जदाराचे नाव व पत्ता, उमेदवार किंवा पक्षाचे नाव किंवा सदर जाहिरात एखादी संस्था - ट्रस्ट-संघटना यांच्याकडून दिली जात असल्यास त्यांचे नाव,मतदारसंघाचे नाव,राजकीय पक्षाचे मुख्यालयाचा पत्ता,ज्या चॅनल/केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करायची आहे त्याबाबत स्पष्ट माहिती कोणत्या उमेदवाराच्या हितासाठी सदर जाहिरात करण्यात आली आहे, त्याबाबत माहिती,जाहिरात सादर करण्यात येत असल्याचा दिनांक, जाहिरातीसाठी वापरण्यात आलेली भाषा,त्याच्या संहिता लेखनाच्या (ट्रास्कींप) साक्षांकित दोन प्रती, जाहिरातीचे शिर्षक,जाहिरात निर्मितीचा खर्च,जाहिरात जर चॅनेलव्दारे प्रसारित केली जात असेल तर किती वेळा ती प्रसारित केली जाणार आहे,त्याचे प्रस्तावित केलेले दर,त्यासाठी लागलेला एकूण खर्च आदी माहिती अर्जदाराने निवडणूक आयोगाने दिलेल्या विहित नमून्यात स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे, या बाबी काटेकोरपणे लक्षात घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आदर्श आचारसंहितेनुसार दिलेल्या निर्देशाचे जाहिरातींमध्ये पालन होणे आवश्यक आहे. या प्रामख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाया बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाया पदार्थाच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाया जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे. इतर देशावर टिका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहचविणारा मजकूर त्यामध्ये नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्य दलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी, वैयक्तिक जीवनातील घटनांना धरून त्यावर भाष्य नसावे. व्हिडीओ व्हॅनद्वारे प्रचारासाठी उपयोगात आणले जाणारे साहित्य याचे माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. या वाहनाची निवडणूक विभागाकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांच्या संमतीशिवाय प्रचार करणाया जाहिराती देता येणार नाहीत. अनुमतीशिवाय जाहिराती प्रकाशित झाल्यास प्रकाशकावर गुन्हा दाखल करण्यात येईल. मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवस अगोदर मद्रीत माध्यमाद्वारे प्रकाशित करावयाची जाहिरात प्रमाणीकरणसाठी समितीकडे दोन दिवस आधी जाहिरातीसह अर्ज सादर करणे आवश्यक राहणार आहे.

पेड न्यूज हा प्रकार आदर्श आचारसंहितेची संलग्न आहे. सारख्या बातम्या येणार नाही याची काळजी घ्यावी. मात्र, त्याचा सारखेपणा तपासताना बातम्यांमध्ये बातमीतून उमेदवाराचा प्रचार आदर्श आचारसंहितेचा भंग याकडे लक्ष वेधावे. एखादया घटनेतील सारखेपणा पेड न्यूज होत नाही. त्यामुळे संपादकांनी देखील या काळात प्रत्येक बातमीवर संपादकीय संस्कार होईल याकडे लक्ष वेधण्याचे आवाहन, त्यांनी केले.

# उपवनसंरक्षक केशव वाभळे यांची ऊनकेश्वर येथील राष्ट्रीय कमळ फुल तलावाला भेट

## मांडवीचे वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक यांच्या हलगर्जीपणामुळे राष्ट्रीय कमळ फुलांची नासाडी



**लोकादेश न्यूज, श्रीक्षेत्र उनकेश्वर : लक्ष्मीचे प्रतीक, भारत व व्हिएतनामचे राष्ट्रीय फूल, तसेच देशातील सर्वात मोठा पक्ष असलेला भाजपाचे प्रचार चिन्ह असलेले नैसर्गिक गुलाबी कमळ मराठवाड्यातील एकमेव नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र उनकेश्वर येथील हे भव्य गुलाबी कामळ तलावाला नांदेडचे उपवनसंरक्षक केशव वाभळे यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली.**

दुर्मिळ असणारे नैसर्गिक गुलाबी कमळ तलाव हे तीर्थक्षेत्र उनकेश्वर येथील पैनगंगेच्या तीरावर आहे. या तलावाचे संपूर्ण क्षेत्रफळ अडीशे एक्कर असून ते वन विभागाचे मालकीचे आहे. या कमळ तलावाला तत्कालीन नांदेड चे उपवनसंरक्षक वरवंटकर, यांनी व किनवट -मतदार संघाचे आमदार भीमराव केराम यांनी दिनांक ५ फेब्रुवारी २०२१ ला भेट दिली होती. या तलावाला पर्यटन निधी लावून विकास करू असे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही राजकीय इच्छाशक्ती अभावी व नांदेड वनविभागाने या पर्यटन स्थळाकडे कायम दुर्लक्ष केले.

नवनिर्वाचित राज्यसभा खासदार डॉ. गोपछडे यांनी प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले गरम पाण्याचे तीर्थस्थानकुंड असलेले शरभंग ऋषी आश्रम श्रीक्षेत्र उनकेश्वर सारख्या या पावन भूमीत शिवलिंगाच्या आकाराचे दुर्मिळ असणा-या नैसर्गिक राष्ट्रीय गुलाबी कमळ तलाव असून त्याचा पर्यटन विकास आराखडा तयार करावा अशी मागणी त्यांनी वनविभागाकडे करतात. नांदेडचे उपवनसंरक्षक वाभळे यांनी ता. २७ मार्चला उनकेश्वर येथील राष्ट्रीय फूल असलेले गुलाबी कमळ तलावाला त्यांनी भेट देऊन पाहणी केली असता पूर्वी या तलावात लाखो गुलाबी कमळ फुललेले असायचे ती फुले व त्याचे रोप नष्ट का झालेली दिसत आहे. याबाबत त्यांनी मांडवीचे वनपरिक्षेत्र अधिकारी आर. बी. जयपुरकर, वनपाल तायडे, वनरक्षक गायकवाड यांना विचारले असता त्यांनी हे गुलाबी कमाल वर्षातून तीन वेळा उगवतात आणि आताही रोपे उगवण्यास सुरुवात झाली म्हणून ही कमळ फुले व रोपे अल्प असल्याचे दिसतात दिसत आहे. अशी खोटी माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी बाजूचे शेतकरी नागोराव राठोड, संतोष देशमुख, हरी देशमुख यांच्याशी चर्चा झाली. त्यानंतर येणा-या दोन वर्षात पूर्ण होणा-या पैनगंगा नदीवरील उच्च पातळी भरायची ही पाहणी केली हा बंधारा पूर्ण झाल्यास या तलावाला एक जलमार्ग निर्माण होईल. तसेच सातारा जिल्ह्यातील कास पठार या पर्यटन स्थळासारखा या गुलाबी कमळ तलावाला बोटानिकल गार्डन करावे अशी मागणी ही येथील काही नागरिकांनी केली. यावेळी सहाय्यक वन संरक्षक गणेश गिरी (जकास) किनवट, फिरते पथक इस्लापूरचे वनक्षेत्रपाल माधव केंद्रे, मांडवी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी आर. बी. जयपुरकर, उनकेश्वर चे वनपाल तायडे, वनरक्षक सुनील गायकवाड, वनमजूर रामकृष्ण घोडाम आदी उपस्थित होते.

**वर्षातील नऊ महिने गुलाबी कमळ उमललेली असतात**

मराठवाड्यातील एकमेव असलेले तीर्थक्षेत्र उनकेश्वर येथील नैसर्गिक गुलाबी कमळ तलाव हा मा. स. नं. १३० याचे क्षेत्रफळ ९४ हेक्टर ३८ आर असून या क्षेत्रापैकी जवळपास ८ हेक्टर मध्ये उंच पर्वताच्या मध्ये हा तलाव आहे. या तलावातील पूर्ण पाणी उन्हाळ्यातही आटत नाही. पावसाळ्यात पावसाचे पाणी भरल्यानंतर ऑक्टोंबर महिन्यापासून कमळ फुले उगवतात. ती फुले जुलै महिन्यापर्यंत सतत उगवत असतात. उगवलेले फुल हे साधारण एक महिना राहतात. त्यानंतर त्यामध्ये फुलांचे पाने गळून बी तयार होत असते. ती बी अतिशय टनक असून त्याच पाण्यात खाली पडते. पाण्यातील जलपर्णी वनस्पती मध्ये कुजल्यानंतर पुन्हा त्यांची उगवण होत असते.

**वनविभागाच्या हलगर्जीपणामुळेच राष्ट्रीय कमळ फुलांची नासाडी**

तत्कालीन मांडवी चे वनपरिक्षेत्र अधिकारी तायनाक व शेरेकर तसेच कर्तव्यदक्ष उनकेश्वरचे तत्कालीन वनपाल वन्यजीव मित्र श्रीनिवास सालमोटी यांनी त्यांच्या कार्यकाळात या नैसर्गिक गुलाबी कमळ फुलांचे संवर्धन व जतन केले होते. त्यावेळी या तलावात लाखो कमळ फुले फुललेली असायची त्यानंतर कार्यरत असलेले वनक्षेत्रपाल जयपुरकर, मुख्यालय न राहणारे उनकेश्वरचे वनपाल तायडे, वनरक्षक गायकवाड यांनी कर्तव्यात हलगर्जीपणा करून भारताचे राष्ट्रीय फूल असलेले कमळ फुलांच्या तलावाला वायावर सोडून दिले. त्यांनी याकडे कधीच आपल्या कार्यकाळात लक्ष दिले नाही. म्हणून पूर्वी लाखो असलेले कमळ फुले आज मोठ्या प्रमाणात नासाडी झालेली उपवन संरक्षक यांना पहावयास मिळाली.

यापूर्वी पळशी शिवारात वनविभागाच्या रुपनातील बैलगाडीने दहा ते पंधरा रोपे तुटली हा ठपका ठेवून औरंगाबादचे मुख्य वनसंरक्षकांनी त्यावेळी कार्यरत असलेल्या वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक यांना निलंबित केले होते. मग राष्ट्रीय लाखो गुलाबी कमळ फुलांची नासाडी करणा-यावर उपवनसंरक्षक काय कारवाई करतात कि त्यांना पाठीशी घालतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोकसभा निवडणूक : नामनिर्देशन पत्रासोबत ना-देय पमाणपत्र आवश्यक




हिंगोली (जिमाका), दि. २७ : लोकसभा निवडणुकीसाठी नामनिर्देशन भरताना उमेदवारांना निवडणूक आयोगामार्फत विविध सूचना देण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने मागील दहा वर्षाच्या कालावधीत कोणत्याही वेळी शासकीय निवासस्थानाचा ताबा घेतला असल्यास त्याच्या वापराचे संबंधीत विभागाचे भाडे, विद्युत आकार, पाणीपट्टी व दूरध्वनी आदी देयके भरून सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीचे ना-देय प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे.

**स्वतंत्र बँक खाते नव्याने उघडणे बंधनकारक :**

उमेदवारांनी लोकसभा निवडणुकीचे आर्थिक व्यवहार करण्यासाठी स्वतंत्र बँक खाते नव्याने उघडावे. हे खाते उमेदवाराला स्वतःचे नावे किंवा निवडणूक प्रतिनिधीसोबत संयुक्तरित्या काढता येईल. सदर बँक खाते नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या किमान एक दिवस अगोदर उघडलेले असणे आवश्यक असून यात केवळ निवडणुकीशी संबंधीतच व्यवहार करायचे आहेत.

**नामनिर्देशन दाखल करताना शंभर मीटरच्या आत ५ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेशास निर्बंध:**

नामनिर्देशन दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात उमेदवार व इतर ४ अशा एकूण पाच व्यक्तींनाच प्रवेश करता येणार आहे. तसेच पाचपेक्षा जास्त व्यक्तींना शंभर मीटरच्या आत प्रवेश मिळणार नाही.

**मान्यताप्राप्त पक्षांना ए व बी फॉर्म दाखल करणे बंधनकारक :**

मान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून निवडणूक लढविणा-या उमेदवाराने पक्षाचे विहित नमुन्यातील ए व बी फॉर्म नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकास दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करणे बंधनकारक आहे.




**अपक्ष उमेदवारांना १० प्रस्तावक आवश्यक :**

उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करताना याच लोकसभा मतदार संघातील प्रस्तावक असणे बंधनकारक आहे. मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पक्षाच्या उमेदवारांना एक मतदार प्रस्तावक तर अपक्ष आणि इतर राज्यातील मान्यताप्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवारांना १० मतदार प्रस्तावक असावे. उमेदवार जर इतर जिल्ह्यातील अथवा मतदार संघातील असेल तर त्याने नामनिर्देशन पत्रासोबत संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. नामनिर्देशनासाठी गर्दी झाल्यास जे उमेदवार नामनिर्देशन पत्र व आवश्यक त्या कागदपत्रांसह उमेदवारीसाठी नामनिर्देशन भरण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात हजर असतील त्यांचाच विचार केला जाईल. दुपारी ३ वाजल्यानंतर बाहेरून कोणतीही कागदपत्रे आणता येणार नाहीत अथवा अन्य कोणाही व्यक्तीस ती देण्यासाठी प्रवेश देता येणार नाही. नामनिर्देशनपत्र व्यक्तीशः उमेदवारांनी अथवा सूचकाने सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने दोन पेक्षा जास्त लोकसभा मतदारसंघामध्ये नामनिर्देशनपत्र दाखल करू नये. ही जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

शपथपत्र व दृढकथन उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करत असताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासमोर मोठ्या आवाजात घेणे आवश्यक आहे. तसे केल्यानंतर साक्षांकित करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांच्या ओळखपत्रासाठी दोन पासपोर्ट साईज रंगीत फोटो नावाची नोंद असलेल्या पाकीटात देणे आवश्यक आहे. नामनिर्देशन पत्राच्या छाननीच्या वेळी उमेदवार, उमेदवारांचे निवडणूक प्रतिनिधी, एक सूचक व एक प्राधिकृत प्रतिनिधी असे एकूण पाच व्यक्तींना प्रवेश दिला जाईल. नामनिर्देशनासाठी उमेदवाराचे वय २५ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची मर्यादा ९५ लक्ष इतकी आहे. उमेदवाराने बँक अकाऊंट, मोबाईल क्रमांक, ई-मेल व पूर्ण पत्ता असलेले निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडील दिलेले पत्र भरून सादर करणे आवश्यक आहे.

१५-हिंगोली लोकसभा मतदार संघासाठी उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत २५ हजार रुपये अनामत रक्कमत भरून त्याची पावती नामनिर्देशनासोबत जोडणे आवश्यक आहे. उमेदवार जर अनुसूचित जाती, जमाती असेल तर त्याने नामनिर्देशन पत्रात उल्लेख करून साक्षांकित करणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती व जमाती उमेदवारासाठी अनामत रक्कम १२ हजार ५०० रोखीने किंवा चलनाने भरणा करणे, शपथपत्रातील सर्व रकाने स्पष्ट शब्दात पूर्णपणे भरणे, सक्षम प्राधिका-यासमोर शपथ घेतल्याबाबतचे शपथपत्र सादर करणे, आदी काही सूचना सोबतच भारत निवडणूक आयोगाने नामनिर्देशनाबाबत निर्गमित केलेल्या सविस्तर सूचनांचे अवलोकन उमेदवारांनी करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

# जिल्हा निवडणूक अधिका-यांनी घेतला टपाली मतपत्रिकांचा आढावा

हिंगोली (जिमाका), दि. ३० : हिंगोली लोकसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया वेग घेत असून, आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी आज दूरदृष्यप्रणालीद्वारे मतदारसंघातील सर्व सहायक निवडणूक अधिकारी तथा पथकप्रमुखांकडून टपाली मतपत्रिकांचा आढावा घेतला.

अपर जिल्हाधिकारी तथा पथक प्रमुख खुशालसिंह परदेशी, जिल्हा सांख्यिकी एस. एम. रचावाड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी, तहसीलदार नवनाथ वगवाड, पोलीस निरीक्षक व्ही. टी. गुट्टे हे प्रत्यक्ष तर दूरदृष्यप्रणालीद्वारे मतदारसंघातील सर्व सहायक निवडणूक अधिकारी उपस्थित होते.

टपाली आणि इलेक्ट्रॉनिकली टपाली मतपत्रिका प्रणालीबाबत आढावा घेताना जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पापळकर यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये मतदारसंघातील ज्येष्ठ मतदार, दिव्यांग मतदारांच्या संख्या पुन्हा तपासून त्याची सुधारित यादी येत्या ४ एप्रिलपर्यंत पाठविण्याचे निर्देश दिले. अत्यावश्यक सेवेतील वाहक व चालकांबाबत मतदान केंद्रांवर जाणाऱ्या बससाठी नमुना १२ अ तर जिल्ह्याबाहेर जाणाऱ्या बसचे वाहक - चालकांसाठी नमुना १२ डी द्यावा. तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील, पोलीस अधिकारी कर्मचारी, बाहेर जिल्ह्याचे निवडणूक कर्तव्यावर असणारे अधिकारी कर्मचारी मतदारांबाबतही अशीच कार्यवाही करण्याच्या सहायक निवडणूक अधिकारी आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचना दिल्या.




बाहेर जिल्ह्यातील निवडणूक कर्तव्यावर असणारे अधिकारी कर्मचारी यांना नमुना १२ वितरीत करणे, विधानसभा निहाय यादी तयार करून वेगवेगळे लखोटे तयार करणे व ते सर्व एका लखोट्यात सहा मतदारसंघाचे सहा लखोटे टाकणे, हे सर्व लखोटे जिल्हा निवडणूक कार्यालयाकडे सादर करण्याच्या सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिल्या.

हदगाव, किनवट, उमरखेड आणि वसमत या विधानसभा मतदारसंघाच्या सहायक निवडणूक अधिकाऱ्यांनी टपाली मतपत्रिका उपकोषागार कार्यालयात ठेवण्याचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. सहायक निवडणूक अधिकारी यांनी नमुना १२ अ ला अनुक्रमांक देणे, विधानसभा मतदार संघनिहाय अर्जाची विभागणी करून ते स्वतंत्र सीलबंद लिफाफ्यात ठेवून संबंधित विधानसभा मतदार संघाकडे पाठविण्याच्या सूचना जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी संबंधितांना यावेळी दिल्या.

## हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती





हिंगोली (जिमाका), दि. २७ : भारत निवडणूक आयोगाने हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दोन निवडणूक खर्च निरीक्षकांची (Expenditure Observer) नियुक्ती केली आहे.

श्री. अन्वर अली हे २००५ च्या आयआरएस बॅचचे अधिकारी असून, ७६६६८७८३७५ हा त्यांचा संपर्क क्रमांक आहे. तामिळनाडू केडरचे अधिकारी असलेले श्री. अन्वर अली हे हिंगोली, वसमत आणि कळमनुरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक खर्चविषयक बाबी पाहणार आहेत. तर कमलदीप सिंह हे २०१५ च्या आयआरएस बॅचचे अधिकारी असून, ९८५५३०६९६७ हा त्यांचा संपर्क क्रमांक आहे. श्री.कमलदीप सिंह हे उमरखेड, किनवट आणि हदगाव या विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक खर्चविषयक बाबी पाहणार आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निरीक्षणासाठी आलेले निवडणूक निरीक्षक अन्वर अली आणि कमलदीप सिंह यांना कोणत्याही राजकीय पक्षांची, उमेदवारांची, नागरिकांची किंवा मतदाराची तक्रार असल्यास वरील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी जिल्हा संपर्क केंद्र व तक्रार निवारण कक्ष स्थापन

हिंगोली (जिमाका), दि. २८ : मा. भारत निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता १६ मार्च २०२४ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीची अधिसूचना दि. २८ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध झाली असून, आदर्श आचारसंहिता दि. १६ मार्च २०२४ पासून लागू झाली आहे. त्या अनुषगाने लोकसभा मतदार संघ अंतर्गत आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे या दृष्टिकोनातून या कार्यालयामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि दरम्यानच्या कालावधीत आचारसंहितेचा भंग झाल्याप्रकरणी नागरिकांना संपर्कासाठी व तक्रार दाखल करण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात स्वतंत्र जिल्हा संपर्क केंद्र व तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

सर्व नागरिकांनी संपर्कासाठी व आचारसंहिता भंगाबाबत काही तक्रार असल्यास १९५० किंवा १८००२३३०८२० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभाग येथे जिल्हा संपर्क केंद्र व तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले असून, हे केंद्र २४ तास कार्यरत आहे. या केंद्रावर व्यक्तिशः किंवा वरील टोल फ्री क्रमांकावरून संपर्क साधावा, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी कळविले आहे.

# महायुतीच्या वतीने खासदार हेमंत पाटील यांचे हिंगोलीत जंगी स्वागत

## हिंगोली लोकसभा मतदारसंघाची दुस-यांदा उमेदवारी मिळाल्याने कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण

**हिंगोली, दि.२९ : शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना हिंगोली लोकसभेची दुस-यांदा उमेदवारी मिळाली. खासदार हेमंत पाटील यांचे हिंगोली नगरीत आगमन होताच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकारी यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत जंगी स्वागत केले.**




शिवसेना प्रमुख तथा राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवार (दि.२८) रोजी लोकसभा २०२४ च्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. यामध्ये मुंबई दक्षिण मध्य, कोल्हापूर, शिर्डी, बुलढाणा, मावळ, रामटेक, हातकणंगले आणि हिंगोली या आठ जागेवर उमेदवार निश्चित केले. हिंगोली लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा पारंपारिक मतदारसंघ असल्याने खासदार हेमंत पाटील यांना शिवसेनेकडून दुस-यांदा उमेदवारी देण्यात आली आहे. उमेदवारी मिळाल्यानंतर खासदार हेमंत पाटील हिंगोली शहरात येताच शिवसेना, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस, रासपा, रिपाई (आठवले गट) या घटक पक्षातील कार्यकर्ते व पदाधिका-यांनी खासदार हेमंत पाटील यांचे जंगी स्वागत केले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा आमदार संतोष बांगर यांच्या पुढाकाराने इंदिरा गांधी चौक, रामलिला मैदान अशी रॅली काढण्यात आली.

याप्रसंगी माजी आमदार रामराव वडकुते, उमरखेडचे सहसंपर्कप्रमुख चितांगराव कदम, सहसंपर्कप्रमुख केशव हरण, नांदेडचे जिल्हा प्रमुख बाबराव कदम कोहळीकर, उमेश मुंडे, आनंदराव बोंढारकर, गंगाधर बडुरे, हिंगोली शहर प्रमुख अशोक नाईक, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी.डी.बांगर, युवासेना जिल्हा प्रमुख राम कदम, संदेश पाटील हडसनिकर, उपजिल्हा प्रमुख अमोल खिल्लारे, तालुका प्रमुख प्रताप काळे, रामप्रसाद घुगे, महिला जिल्हाध्यक्ष रेखा देवकते, उपजिल्हा प्रमुख डॉ.बी.एन.चव्हाण, वसमतचे तालुका प्रमुख राजू चापके, महागावचे तालुका प्रमुख राजू राठोड, उमरखेडचे तालुका प्रमुख संतोष जाधव, प्रवीण मिराशे, उमरखेड तालुका प्रमुख अतुल मैड, तालुका संघटक कपील चव्हाण, युवासेना जिल्हाप्रमुख अविनाश कदम, कृष्णा हिंगमिरे, किनवटचे तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, हदगावचे तालुका प्रमुख विवेक देशमुख, राम तंबाखे, पवन राठोड, हिमायतनगर तालुका प्रमुख रामभाऊ ठाकरे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संभाराव लांडगे, उमरखेड शहर प्रमुख संदीप ठाकरे, नगरसेवक श्रीराम बांगर, नगरसेवक गणेश बांगर, माजी सभापती फकीरा मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष केशव दुबे, युवासेनेचे मन्ना यादव, राजू नांगरे, सुशिला आठवले, शंकर यादव, गंगाधर पोले, पंजाब चव्हाण, राम नागरे, प्रकाश घुगे यांच्यासह शामराव खटींग, उमेश पोले, नितीन होकर्णे, दिनकर गंगावणे यांच्यासह शिवसेना, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस, रासपा, रिपाई (आठवले गट) या घटक पक्षातील कार्यकर्ते व पदाधिका-यांनी खासदार हेमंत पाटील यांचे फटाके फोडून जंगी स्वागत केले.

### महाआघाडीकडून आष्टीकर मैदानात !



किनवट : हिंगोली लोकसभा मतदारसंघातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) - कॉंग्रेस - राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) व मित्रपक्ष महाआघाडीच्यावतीने हदगाव-हिमायतनगरचे माजी आमदार नागेश पाटील आष्टीकर यांना उमेदवारी देण्यात आली.त्यांना उमेदवारी मिळल्याबद्दल महाआघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला असून, नागेश पाटील यांना विजयी करण्याचा निर्धारही कार्यकर्त्यांनी केला आहे.




किनवट - हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीचे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना पुन्हा महायुतीच्यावतीने उमेदवारी जाहीर झाल्यानंतर गुरूवारी दि.२८ किनवट शहराच्या शिवाजी चौकात महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सखाराम मुळे यांनी घेतला टपाली मतदान अधिकारी-कर्मचारी आढावा



**उमरखेड, दि ३०( उमाका) : सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी तहसील कार्यालयातील सभागृहात टपाली मतदान अधिकारी व कर्मचा-यांचा आढावा घेतला.**

यावेळी नायब तहसीलदार वैभव पवार, नायब तहसीलदार कावरे उपस्थित होते. २०२४ लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लोकसभा मतदार संघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत व पारदर्शकपणे पार पाडावी, यासाठी नेमण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचा-यांनी कर्तव्यात कसूर न ठेवता दक्ष राहण्याचे आवाहन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले. १५- हिंगोली लोकसभा मतदार संघात ८२- उमरखेड विधानसभा मतदार संघ समाविष्ट आहे. उमरखेड तहसील कार्यालय येथील सभागृहामध्ये टपाली मतदानाशी संबंधितांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. निवडणूक आयोगाने आवश्यक गोष्टीची पूर्ण पूर्तता करण्यास अधिन राहून टपाली मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विशेष मतदार, सेनादलातील मतदार निवडणुकीचे काम करणारे मतदार प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेत असलेले मतदार अनुपस्थित मतदार वरिष्ठ नागरिक, दिव्यांग, अत्यावश्यक सेवेतील मतदारांचा समावेश होतो.

**निवडणुकीचे काम करणा-या मतदारासाठी टपाली मतदान**

निवडणुकीच्या कामकाजासाठी नियुक्त केलेले अधिकारी-कर्मचारी निवडणूक कामात आवश्यक असणारे मदत करणारे अशासकीय कामगार तसेच बंदोबस्तासाठी नियुक्त पोलीस अधिकारी-कर्मचारी, होमगार्डना टपाली मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर कर्मचारी नेमणूक स्वतःचे विधानसभा मतदार संघात झालेली असल्यास निवडणूक कार्य प्रमाणपत्राव्दारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध आहे. कर्मचारी नेमणूक मतदार संघाबाहेर झाल्यास टपाली मतदान आधारे मतदान करण्याची सुविधा असेल.

**इडीसी व टपाली मतदानासाठी अर्ज सादर करणे**

टपाली मतदानसाठी नमुना फॉर्म १२ नमुना फॉर्म १२A विहित कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचाकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत विधानसभा मतदारसंघ क्रमांक मतदार यादी भाग क्रमांक मतदार यादीतील क्रमांक तसेच नेमणूक आदेश क्रमांक दोन प्रति, निवडणूक ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील अर्ज सादर करणे तसेच अर्जात काही दुरुस्ती असल्यास ती पूर्ण करणे प्रतिक्रिया उमेदवारी माघार घेण्याच्या दिनांकापूर्वी पूर्ण होणे आवश्यक राहील.

**मतदानासाठी सुविधा केंद्र**

प्रत्येक प्रशिक्षणाच्या ठिकाणी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालया ठिकाणी टपाली मतदानासाठी सुविधा केंद्र उभारण्यात येईल उमेदवार किंवा त्याचे प्रतिनिधी यांना सुविधा केंद्र ठिकाणी उपस्थित राहून प्रक्रिया पाहू शकतात. प्रत्येक प्रशिक्षण सत्रात किमान २ तास किंवा प्रशिक्षणानंतर व्यवस्था होऊ शकते. २ तासापेक्षा अधिक कालावधी दिला जाऊ शकतो.

**निवडणुकीचे काम करणाऱ्या मतदारासाठी टपाली मतदान**

टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर प्रथम नमुना १३ A मधील घोषणापत्र भरून त्यावर स्वाक्षरी करावी. उपस्थित राजपत्रित अधिकारी मतदाराचे ओळखपत्र तसेच टपालीमधील पत्रिका क्रमांक नमुना १३ऋमध्ये नोंदविला आहे, याची खात्री करून घोषणापत्र साक्षांकित करतील. मतदार हा मतदान कक्षात जाऊन नमुना १३ ए च्या आतील लिफाफ्यावर मतपत्रिका क्रमांक नमूद करेल व आपल्या पसंतीच्या उमेदवार समोर खूण (MARK) मार्क करून गोपनीयरीत्या मतदान करतील.

मतदान केलेली मतपत्रिका नमुना १३ ए यातील लिफाफ्यावर टाकून सीलबंद करा नमुना १३A मधील घोषणापत्र व मतपत्रिका असलेल्या नमुना १३ ए हे दोघांना मोठा लिफाफा नमुना १३ क मध्ये ठेवून बाहेरील लिफाफा सील बंद करावा नमुना १३ क लिफाफा सुविधा केंद्रावरील पेटीत टाकावा लागतो, असे त्यांनी सांगितले.

साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदुस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com